<u>निशाणी कमांक 43 पुढे/</u>

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उर्वरीत सरतपास शपथेवर पुढे सुरू :—**
**प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री एल.एन.गायकवाड**

सदरकामी मी दि. २९.४.२०२४ रोजीचे सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांच्यातर्फे आलेले पत्र मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५३ देण्यात येते. सदरकामी मी गु.र.नं. १०५/२०२२ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५४ देण्यात येते. सदरकामी मी गु.र.नं. १०५/२०२२ मधील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो। यांना सहायक पोलिस उपनिरीक्षक, सासवड पोलिस स्टेशन यांनी अटक आरोपीस सी.आर.पी.सी. कलम १६९ प्रमाणे सोडून देण्याबाबतचा अर्ज व त्यावरील आदेशासहीत प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५५ देण्यात येते. सदरकामी मी क्रिमीनल ॲप्लिकेशन नं. ९७७/२०२२ मधील आदेश व सोबत उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी दिलेल्या म्हणण्यासहीत प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५६ देण्यात येते. सदरकामी मी दि. १२.०७.२०२४ रोजीचे सासवड, पोलिस स्टेशन यांनी मला दिलेले समजपत्र मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५७ देण्यात येते.

सदरकामी मी मौजे केतकावळे येथील गट क्र. ७१८/१ चा ७/१२ सत्यप्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५८ देण्यात येते. सदरकामी मी मौजे केतकावळे येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ३०४ चा सन २०१५—१६ ते २०१८—१९ कर आकारणी नोंदवही नमुना नं. ८ ची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ५९ देण्यात येते. सदरकामी मी अदखलपात्र गुन्हा नोंदणी क्र. ३९८/२०१९ फौ.प्र.सं. कलम १५५ अन्वये अहवाल सत्यप्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ६० देण्यात येते.

सदरकामी मी खरेदीखत नं. ३७१/२०२४ चा मुळ दस्त दाखल केला आहे. त्यावर सोपान शिवराम पांगरकर, केशव शिवराम पांगरकर व माझी सही आहे. तसेच संमती देणार सुलाबाई शिवाजी बाठे यांचा निशाणी अंगठा आहे. तसेच साक्षीदार कदम व कोंढाळकर यांच्या सह्या आहेत. त्या मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ६१ देण्यात येते. सदरकामी मी खरेदीखत क्र. १०५७/२००९ ची मुळ दस्त दाखल केला आहे. त्यास निशाणी क्र. ६२ देण्यात येते. सदरकामी मी खरेदीखत क्र. ७९३/२०११ ची मुळ दस्त दाखल केला आहे. त्यास निशाणी क्र. ६३ देण्यात येते.

**वादीतर्फे विधिज्ञ यांनी अजून काही कागदपत्रे राहिली आहेत का ते पाहून उर्वरीत सरतपास घ
ेण्यास मुदत मागितली. सबब, उर्वरीत सरतपास तहकूब.**

माझे समक्ष श्रवणोत्तर स्विकृत

RAVINDRA ANANDRAO SAWANT

Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2025.11.24 15:46:35 +0530

( र.आ.सावंत )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश.क स्तर,
सासवड

दिनांक २४/११/२०२५